# महाराष्ट्र शासन

क्र.सासंवि-१०१७/७५VIP/प्र.क्र.१४१/का.१६
विधि व न्याय विभाग,
मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ११ ऑक्टोबर २०१७.

प्रति,
सह सचिव/उप सचिव (आस्थापना),
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालय, मुंबई.

**विषय:- विधि व न्याय विभागाच्या अधिपत्याखालील श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या आस्थापनेवरील प्रशासकीय अधिकारी या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्याबाबत**

**महोदय,**

विधि व न्याय विभागाच्या अधिपत्याखालील श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या आस्थापनेवरील प्रशासकीय अधिकारी (वेतनश्रेणी १५६००-३९१००+ग्रे.पे.५४००) या संवर्गाच्या दोन पदांवर उपरोक्त वेतनश्रेणी धारण करण्याच्या अधिकाऱ्यांची प्रतिनियुक्तीद्वारे नियुक्ती करावयाची आहे.

२. सर्व मंत्रालयीन विभागास विनंती करण्यात येत आहे की सदर पदांवर प्रतिनियुक्तीने जाण्याकरीता इच्छुक असलेल्या आपल्या विभागातील अधिकाऱ्यांची नावे, त्यांच्या ५ वर्षाच्या गोपनीय अहवालांसह, वैयक्तिक माहिती आणि ना-विभागीय चौकशीचे प्रमाणपत्र इ. बाबतच्या माहितीसह विधि व न्याय विभागाकडे दि.१०.११.२०१७ पर्यत निश्चितपणे प्राप्त होईल अशाप्रकारे पाठवावीत. इच्छुक अधिकाऱ्यांची प्रतिनियुक्तीसाठी निवड झाल्यास त्यांना संबंधित विभाग कार्यमुक्त करील किंवा कसे याबाबत देखील आपल्या विभागाचे अभिप्राय देण्यात यावेत. निवड झाल्यानंतर अधिकाऱ्यांस त्यांचे नाव मागे घेता येणार नाही.

३. सदर पत्राची प्रत महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईट संदेशफलक या टॅबखाली प्रसिध्द करण्यात आली आहे.

**आपली,**

Chavan

**(रा.व.चव्हाण )**
**कार्यासन अधिकारी, विधि व न्याय विभाग**

प्रत:- अवर सचिव, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई यांना विनंती करण्यात येते की, सदर पत्राची प्रत महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवरील संदेशफलक या टॅबखाली प्रसिध्द करण्यात यावी.